ज्योतिर्मयी

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक २८ वा ❑ भारतीय सौर दिनांक १४ फाल्गुन शके १९४७, गुरूवार दि.०५ मार्च २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)

विशेष लेख...

पूर्व परवानगी शिवाय स्मार्ट मीटर लावले जात आहे

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय 🕮 साहित्य

स्मार्ट मीटर लावले जाऊ नये म्हणून महाराष्ट्रात लोकांनी महावितरण व सरकार विरोधात आंदोलन केले होते परिणामतः सरकारने विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर स्मार्ट मीटर लावले जाणार नाही याची ग्वाही दिली होती व विधानसभेच्या निवडणुकीनंतर सरकारने आपला शब्द फिरवला व स्मार्ट मीटर लावण्याची लगबग सुरू होताच परत लोकांनी स्मार्ट मीटर विरोधात आंदोलन सुरू केले. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने विधानसभेत स्मार्ट मीटर पूर्वपरवानगी शिवाय लावले जाणार नसल्याची ग्वाही दिली मात्र आता सरकारने आपला शब्द फिरवला आहे.

विधानसभेत स्मार्ट मीटर न लावण्याचे आश्वासन देऊनही आता वीज कंपनीच्या माध्यमातून हे मीटर बसवले जात आहेत.

महाराष्ट्रात महावितरण कडून घरगुती वीज ग्राहकांच्या घरी पूर्वपरवानगी शिवाय आणि जबरदस्तीने प्रीपेड स्मार्ट मीटर बसवण्याची मोहीम सुरू झाली आहे. विधानसभेत सरकारने हे मीटर न लावण्याची ग्वाही दिली होती मात्र आता ती फिरवत ठाणे, नागपूरसह विविध ठिकाणी स्मार्ट मीटर बसवण्याचे काम वेगाने सुरू असल्याने संताप व्यक्त होत आहे.

विधानसभेत स्मार्ट मीटर न लावण्याचे आश्वासन देऊनही आता वीज कंपनीच्या माध्यमातून हे मीटर बसवले जात आहेत. कामगार आणि सामाजिक संघटनांनी या निर्णयाला विरोध केला असून स्मार्ट मीटर बसवण्यास आल्यास कर्मचाऱ्यांना हाकलून लावण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

मुंबईत या योजनेला तीव्र विरोध असून नागरिकांनी ते अमान्य केले आहे आणि याला ''जनता विरोधी'' पाऊल मानले आहे.

केंद्र सरकारच्या योजने अंतर्गत वीज कंपन्या स्मार्ट मीटर लावण्याचा प्रयत्न करत आहेत.

स्मार्ट मीटरच्या जबरदस्ती बसवण्या विरोधात मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात सुनावणी सुरू असून सरकारला उत्तर सादर करण्यासाठी मुदत देण्यात आली आहे. या निर्णयामुळे सामान्य वीज ग्राहकांमध्ये भीती आणि नाराजी पसरली आहे.

महावितरणच्या स्मार्ट मीटरला नागरिकांचा प्रचंड विरोध आहेत. मात्र, खासगी कंपनीने काहीही करून स्मार्ट मीटर बसविण्याचा चंगच बांधला आहे.स्मार्ट मीटर नाकारणाऱ्या ग्राहकाचा वीजपुरवठाच बंद करण्याचा प्रकार कंपनीकडून सुरू आहे. त्यामुळे नागरिकांतून संतापाची लाट उसळली आहे. महावितरणच्या तोंडी आदेशावरून स्थानिक अधिकारी, कर्मचाऱ्यांना डोकेदुखी बनला आहे.

महावितरणच्या स्मार्ट मीटरला राज्यात सर्वत्र विरोध होत आहे. मीटरची किंमत, दर्जा आणि वाढीव येणारे वीज बिल अशा तक्रारींचा पाढा वाचत नागरिकांनी वारंवार आंदोलने केली आहेत. त्यामुळे महावितरणने प्रथम स्वत:ची यंत्रणा त्यानंतर सरकारी कार्यालये, फॉल्टी मीटर असे टप्प्याटप्प्याने मीटर बसविण्याचा धडाका सुरू केला आहे. तरीही नागरिकांचा विरोध मावळत नाही. खासगी कंपनीचे कर्मचारी मीटर बसविण्यास येताच नागरिकांतून तीव विरोध होत आहे. या पार्श्वभूमीवर महावितरण कंपनीने आता महावितरणच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना या कामासाठी तगादा लावला आहे. कंत्राटी कर्मचाऱ्यांनी या कामास विरोध दर्शविला असला, तरी अधिकाऱ्यांच्या दबावामुळे काही ठिकाणी हे काम सुरू केले आहे.

स्मार्ट मीटर थकबाकी किंवा प्रीपेमेंटमध्ये निगेटिव्ह बॅलन्स (नेगेटिव्ह बॅलन्स) झाल्यास रिमोट सिग्नलद्वारे वीज पुरवठा आपोआप खंडित करतात. फोन पे किंवा इतर ऑनलाइन सुविधेद्वारे बिलाची त्वरित भरणा केल्यास अनेकदा २० ते ३० मिनिटांत वीज पुरवठा पूर्ववत होऊ शकतो. अन्यथा ग्राहकांना अंधारात राहावे लागते.

स्मार्ट मीटर रिमोट तंत्रज्ञानाद्वारे थेट वीज कंपनीच्या सर्व्हरशी जोडलेले असतात त्यामुळे बिलाची रक्कम वेळेत न भरल्यास वीज पुरवठा आपोआप खंडित केला जातो.फोन पे सारख्या माध्यमांतून बिल भरल्यानंतर साधारणतः २० मिनिटांत किंवा काही वेळात वीज पुरवठा पुन्हा सुरू होतो.प्रीपेड मोडमध्ये असणाऱ्या स्मार्ट मीटरमध्ये बॅलन्स संपल्यास वीज कपात होते. वाढीव बिलांमुळे आणि अचानक वीज कापल्यामुळे ग्राहकांकडून स्मार्ट मीटरला विरोध होत असून थकबाकीदारांचा वीज पुरवठा थेट ऑनलाइन पद्धतीने खंडित केला जात आहे.

पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीत ५ ते ८ मार्चला महिला कला महोत्सव

ज्योतिर्मय 🕮 साहित्य

मुंबई – महिला दिनाचे औचित्य साधत महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, प्रभादेवी यांच्या वतीने सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून ५ ते ८ मार्च दरम्यान ''महिला कला महोत्सव २०२६'' या सांस्कृतिक सोहळ्याचे आयोजन पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, प्रभादेवी, मुंबई येथे करण्यात आले आहे. नृत्य, नाट्य, संगीत, मुलाखती, छायाचित्र प्रदर्शन तसेच महिला बचतगटांच्या वस्तूंचे प्रदर्शन व विक्री अशा विविध कलाप्रकारांची समृद्ध मेजवानी या महोत्सवात रसिकांना अनुभवता येणार आहे.

५ मार्च रोजी सायं. ६ वाजता सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन होणार आहे. उद्घाटनानंतर सायं. ७ वाजता महाभारतात अभिमन्यूच्या वीरगतीनंतर अभिमन्यूची पत्नी उत्तरा हिची झालेली मनोवस्था दर्शवणारी नृत्यनाटिका ''उत्तरा'' सादर होणार असून याचे संकल्पना आणि दिग्दर्शन सोनिया परचुरे यांचे असून, ज्येष्ठ गायिका पद्मश्री अश्विनी भिडे देशपांडे यांचे या नृत्यनाटिकेसाठी विशेष योगदान लाभले आहे. या नृत्यनाटिकेसाठी सादर होत असलेल्या काही रचनांना त्यांनी स्वरबद्ध केले आहे. या नृत्यनाटिकेचे संगीत प्रणव हरिदास यांचे असून, लेखन मुग्धा गोडबोले, काव्य शिवप्रिया सुर्वे यांनी केलेले आहे. यात शरयू नृत्य कलामंदिरच्या ज्येष्ठ विद्यार्थ्यांचा सहभाग असणार आहे. रात्री ८ वाजता मृणालिनी नानिवडेकर, संपादक मल्टीमीडिया, पुढारी माध्यम समूह यांची ''माध्यमप्रमुख ती'' (फिल्ड पत्रकारिता ते माध्यमातील बॉस : एक वेगळ्या वाटेवरचा प्रवास) ही मुलाखत सुप्रसिद्ध निवेदिका मृण्मयी भजक घेणार आहेत.

६ मार्च रोजी दुपारी ४ वाजता 'कोलाज क्रिएशन्स, पुणे यांचे ''आनंदमठ'' हे सुप्रसिद्ध कवी व लेखक बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांच्या कादंबरीवर आधारित विनीता तेलंग लिखित आणि रवींद्र सातपुते दिग्दर्शित संगीत नाटक सादर होणार आहे. नंतर सायं. ५ वाजता – महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांची महिला सशक्तीकरणा संदर्भात मुलाखत अभिनेत्री संजना पाटील घेणार आहेत. रात्री ७.३० वाजता ''वृक्षवल्ली आम्हां सोयरे वनचरे'' हा ८० वर्षात सुमारे ८ हजार झाडे लावणाऱ्या आणि जगवणाऱ्या पद्मश्री सालुमरदा थिम्मक्का यांना समर्पित नृत्याविष्कार सादर होणार आहे. याची संकल्पना व नृत्य दिग्दर्शन विदुषी शमा भाटे यांनी केलेले आहे.

७ मार्च रोजी दुपारी १२ वाजता ''एक तिची गोष्ट'' हे फुलवा खामकर व अस्मा खामकर यांचा अभिनय असलेले मराठी नृत्य-संगीत नाटक सादर होईल. त्यानंतर दुपारी ३ वाजता संगीतकार आनंदी विकास व सह कलाकार ''ती चे सूर'' हा सरस्वतीदेवी, आनंदघन, उषा खन्ना, उषा मंगेशकर, आनंदी विकास, मीना खडीकर या महिला संगीतकारांनी संगीत दिलेल्या गाण्यांचा कार्यक्रम होईल. दुपारी ४ वाजता जयमालाबाई शिलेदार यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त त्यांच्या गाजलेल्या ८ नाटकातील ''संगीत अष्टनायिका'' हा दीप्ती भोगले यांची संकल्पना आणि निवेदन वर्षा जोगळेकर असलेला खास कार्यक्रम सादर केला जाणार आहे.

सायं ५ वाजता सुप्रसिद्ध कवियत्री आणि लेखिका अरुणा ढेरे यांच्या ''कृष्णकिनारा'' या पुस्तकावर आधारित मुक्तनाट्य ''मुक्ता'' हे मुक्तनाट्य सादर होईल. याची संकल्पना, अभिवाचन, नृत्य दिग्दर्शन अर्चना अनुराधा यांचे असून, स्नेहल दामले यांनी संहिता लेखन, तर संगीतदिग्दर्शन सुप्रसिद्ध संगीतकार कौशल इनामदार यांनी केले आहे. रात्री ८ वाजता भूषण कोरगावकर लिखित आणि दिग्दर्शित ''मी कात टाकली'' हा खानदानी लावणीचा कार्यक्रम रंगणार आहे. लावणी सम्राज्ञी शबानाबाई अष्टुरकर यांची खरीखुरी प्रेमकहाणी, सोबत पेटी-तबल्यावरची खणखणीत, खानदानी लावणी असं या कार्यक्रमाचं स्वरूप आहे. यात सुप्रसिद्ध लावणी कलाकार गौरी जाधव, पुष्पा सातारकर, गीता वाईकर आणि सुप्रसिद्ध अभिनेत्री अनिता दाते आपली कला सादर करणार आहेत.

८ मार्च रोजी सकाळी ११ वाजता प्रा. चेतक घेगडमल लिखित आणि शिवानी पेडणेकर दिग्दर्शित भारतीय पहिल्या महिला प्रॅक्टिसिंग डॉक्टर रखमाबाई सावे-राऊत यांच्या जीवनसंघर्षावर आधारित ''रखमाबाई सावे राऊत यांची संघर्ष कहाणी'' अर्थात ''धि हिंदू लेडी'' हे नाटक सादर होणार आहे. दुपारी ३ वाजता विदुषी माधवी नानल यांची संकल्पना असलेला वेगवेगळ्या विषयांवरील रागदारी बंदिशींचा कार्यक्रम ''शब्दरंग सूरसंग'' सादर होईल. नंतर सायं ५ वाजता स्त्री गायक-बंदिशकार यांच्या अमूल्य योगदानाला समर्पित असा कार्यक्रम ''स्त्री-स्वर-गौरव'', ह्या कार्यक्रमाची संकल्पना आणि दिग्दर्शन अनुजा झोकरकर यांचे आहे त्यानंतर रात्री ८ वाजता ''आदिम गीतकथा'' हा कार्यक्रम सादर होणार आहे, ज्यात आदिवासी स्त्रियांच्या भावविश्वाचे दर्शन घडवणारी संगीतमय कलाकृती महिला राज्य महिला आयोगाच्यावतीने याचे सादरीकरण होणार आहे आणि सादरकर्ते आहेत प्राची माया गजानन.

यंदा आयोजित करण्यात येणाऱ्या महिला कला महोत्सवाच्या निमित्ताने अकादमीच्या कलांगणात खासकरून महिलांसाठी ऑन द स्पॉट व्यंगचित्रे आणि फूटमसाज ही विशेष आकर्षणेही उपलब्ध असणार आहेत. सांस्कृतिक कार्य विभाग तसेच पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी यांच्या सहयोगाने महिला दिनाचे औचित्यसाधून खास करून हा कला महोत्सव साजरा करण्यात येणार आहे. या संपूर्ण महोत्सवाची विशेष बाब म्हणजे हा महोत्सव सर्वांसाठी खुला असून इथे सादर करण्यात येणाऱ्या विविधरंगी कार्यक्रमांना विनामूल्य प्रवेश देण्यात आला आहे. या भव्य सांस्कृतिक पर्वणीचा रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून त्याचा विविधांगी मनसोक्त असा आस्वाद घावा असे आवाहन सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केले आहे.

आठवणींची जत्रा

ज्योतिर्मय 🕮 साहित्य

लॉकडाऊनमधला रिकामा वेळ अस्वस्थ करणारा असला तरी समृद्ध करणाराही होताच. आमचा रोजचा दिनक्रम ठरलेला होता. सातच्या आत सगळ्यांनी उठायचंच मग नाश्ता झाला की गप्पांचा फड जमायचा. कॅरम, पत्ते खेळणं तर रोजचंच. शब्दकोडं सोडवायला कृष्णा याकाळात शिकला आणि मी अनेक शब्दकोडी तयार करुन ती त्याला सोडवायला द्यायचे. ''आई, तुला इतके शब्द कसे गं माहीत?''

हा प्रश्न त्यांनी विचारला आणि आमचे पुढचे तीन-चार दिवस अगदी मजेत गेले शब्दांशी खेळण्यात.

माझ्याकडे इतका शब्दसंग्रह कसा, हे त्याला समजावून सांगणं फार काही कठीण नव्हतं कारण जोडीला वैष्णवी होतीच.

आमच्या लहानपणीच्या काही गमतीजमती सांगितल्या आम्ही भावंड एकमेकांना समजू नये म्हणून रफची आणि अशा अनेक भाषा बोलायचो, शब्दक्रम उलटा करून बोलणं किंवा गावांच्या नावांच्या भेंड्या, गाण्यांच्या भेंड्या, फक्त मुलांची, मुलींची नावे अशा भेंड्या खेळायचो हे त्याला सांगितलं.

मग ही चर्चा पुढे जात एकाच शब्दाचे दोन वेगवेगळे अर्थ, एकाच अक्षराचे वेगवेगळे उच्चार उदा. च, ज वगैरे., म्हणी, वाक्प्रचार अशी वळणं घेत ही चर्चा अशा काही शब्दांवर आली ज्यांच्या अर्थात किंचित फरक असतो.

उदा. आमंत्रण -निमंत्रण , जत्रा-यात्रा

यात्रा म्हटलं की माझ्या बालपणीच्या यात्रेच्या काही आठवणी जाग्या झाल्या. मी त्यात रमले पण कृष्णाला यात्रा-जत्रा हा प्रकारच माहिती नव्हता. यात्रा म्हणजे काय जत्रा म्हणजे काय हे जाणून घेण्यासाठी आता तो आतुर झाला.

मग ती जबाबदारी मी वैष्णवीवर सोपवली कारण तिनं पुसेगावची यात्रा पाहिलीय आणि धमालही केलीय.

एखादा छोटासा विषय विस्तार करून सांगण्यात तिचा हात कुणी धरुच शकत नाही.

वैष्णवीने कृष्णाकडे मिश्किल नजरेनं पाहिलं.

''अरे, यात्रा म्हणजे फक्त फिरायला जाणं नसतं रे! ती म्हणजे गावचा उत्सव असते.''

कृष्णाचे डोळे मोठ्ठे झाले.

''म्हणजे?''

''म्हणजे ऐक'' तिचा आवाज जरा रंगतदार झाला.

''पुसेगावची यात्रा म्हणजे एक वेगळीच दुनिया! गावात वेगळाच उत्साह भरुन राहिलेला असतो. मंदिराभोवती रंगीत कागदी पताका, लाउडस्पीकरवर भजनं, ढोल-ताशांचा नाद आणि रस्त्याच्या दुतर्फा उभे असलेले छोटे छोटे स्टॉल्स.''

कृष्णा मंत्रमुग्ध होऊन ऐकत होता.

''तिथं काय काय मिळतं?'' त्याचा पहिला प्रश्न.

''अरे काय नाही मिळत हे विचार. गरमागरम जिलेबी, भेळ,भजी, गूळ-शेंगदाण्याची चिक्की, साखरफुटाणे, रंगीत फुगे, लाकडी खेळणी, बांगड्या आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे झोपाळे! मोठ्ठं फिरणारं चक्र त्यात बसलं की पूर्ण गाव खाली दिसतं.''

कृष्णा लगेच म्हणाला, ''मग मला का नाही नेलं कधी?''

आता नक्की घेऊन जाऊ हं, असं आश्वासन मी त्याला दिलं.

आम्ही सगळेच हसलो.

वैष्णवी पुढे म्हणाली, ''यात्रा म्हणजे फक्त खाणं-पिणं किंवा खेळ नाही. गावातले सगळे लोक एकत्र येतात. नातलग भेटतात. कुणी जुना मित्र भेटतो. एखादी नवी ओळख होते.''

कृष्णा थोडा विचारात पडला.

''मग जत्रा आणि यात्रा वेगळी असते का?''

मी म्हणाले, ''हो. जत्रा म्हणजे मेळा गजबज, बाजार, करमणूक.

यात्रा म्हणजे श्रद्धा, देवदर्शन, परंपरा, भक्ती.''

वैष्णवीने लगेच निष्कर्ष काढला,

''म्हणजे यात्रा मनासाठी आणि जत्रा मजेसाठी!''

''मग आमचे सर सारखे म्हणत असतात, शाळा आहे की जत्रा भरलीय? आम्ही मुलं दंगा करतो म्हणून सर तसं म्हणतात का?''

त्याच्या त्या वाक्यावर आम्ही सगळ्यांनी हसून दाद दिली. कृष्णा नव्याने शिकलेला शब्द आणि त्याचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करत होता

त्या दिवशी संध्याकाळी पुन्हा शब्दांचा खेळ रंगला.

''आई, 'मेला' आणि 'मेळा' यात फरक काय?''

'''कळ' आणि 'कल' यात?''

प्रश्नांची रांग लागली.

मला त्याच्या प्रश्नांची उत्तरं देणं कठीण जाऊ लागलं. माझी अवस्था वैष्णवीनं ओळखली आणि मला त्याच्या प्रश्नांच्या चक्रातून सोडवण्यासाठी आणि एकूणच ती परिस्थिती हाताळण्यासाठी ती परत पुढं सरसावली.

वैष्णवी सांगू लागली आणि आम्ही सगळे तिच्या आठवणींच्या यात्रेत फिरू लागलो

''एकदा काय झालं,'' ती म्हणाली, ''मी आणि माझी मैत्रीण झोपाळ्यावर बसलो. मोठ्ठं फिरणारं चक्र! वर गेल्यावर खाली बघितलं की माणसं अगदी मुंग्यांसारखी दिसायची. आम्ही खूपच खुश !''

''मग?'' कृष्णा उत्कंठेनं विचारु लागला.

''मग खाली उतरलो तर लक्षात आलं आमच्या चपला गायब!'' ''काय??'' कृष्णा खळखळून हसला.

''हो! झोपाळ्याखाली आम्ही दोघींनी चपला काढून ठेवल्या होत्या. पण यात्रेच्या गर्दीत कुणी तरी चुकून घेऊन गेलं असावं. आता आम्ही दोघी अनवाणी!''

''मग काय केलंत?'' मीही मुद्दाम गंभीर चेहरा करून विचारलं.

''पहिल्यांदा तर आम्ही एकमेकींकडे बघितलं आणि मग हसायला लागलो. कारण तिची एक लाल आणि तशीच पण निळी चप्पल सापडली होती आणि तिनं दोन पायात वेगवेगळ्या रंगांच्या चपला घातल्या होत्या ! कुणीतरी घाईघाईत मिसमॅच करून गेलं होतं.''

कृष्णा तर पोट धरून हसू लागला.

''आणि गंमत म्हणजे,'' वैष्णवी पुढे म्हणाली, ''आम्ही त्या वेगवेगळ्या चपला घालूनच अर्धी यात्रा फिरलो. लोक आमच्याकडे बघून हसत होते. शेवटी एका काकूंनी चप्पल ओळखली आणि म्हणाल्या, 'अगं, ही तर माझ्या मुलीची चप्पल!''' अशा प्रकारे तिची चप्पल सापडली

तर माझी एक चप्पल खेळण्याच्या स्टॉलपाशी आणि दुसरी भजीवाल्याकडे सापडली!

कृष्णासाठी हे मजेशीर प्रकरण होतं त्यामुळे पुढचे प्रश्न थोड्या काळासाठी का होईना पुढे ढकलले गेले होते.

त्यामुळे या एका प्रसंगावरून घरात दहा मिनिटं हशा पिकला.

कृष्णा म्हणाला,

''आई, आपण लॉकडाऊन संपला की यात्रेला जायचंच. पण आधी चपलांवर नावं लिहून ठेवू!''

आणि मग दुसऱ्या दिवशी त्याने घरातच ''घरगुती यात्रा'' भरवली

सोफ्यावर झोपाळा,

टेबलावर भजीचा स्टॉल,

बिस्किटांचा स्टॉल, आणि दरवाज्याजवळ चपलांचा खास ''स्टॉल'' ज्यावर मोठ्या अक्षरात लिहिलं होतं,

'आपल्या चपला आपली जबाबदारी!'

लॉकडाऊनच्या त्या दिवसांत बाहेर कुठंही जत्रा भरली नव्हती,

पण घरातला आनंद मात्र अगदी अविस्मरणीय होता. लॉकडाऊनमुळे बाहेरचे दरवाजे बंद झाले होते, पण घरातल्या संवादांचे दरवाजे मात्र रुंद झाले होते.

कृष्णाला घेऊन आम्ही कुठेच यात्रेला गेलो नव्हतो ती उणीव भरून काढायची, असं मनोमन ठरवलं कारण आठवणींची जत्रा मात्र आता माझ्या मनात भरली होती.

जात्यावरच्या ओव्या.....

मायबापावानी मया
नही समद्या जगात
नको धुंडाळू सावली
बाभळीच्या रानात ||५२६||

मायबापावानी मया
नही धरती आभाळी
गार आंब्याची सावली
कश्या देतीन बाभळी? ||५२७||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक - भाग ३

विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

ज्योतिर्मय साहित्य

प्रभाती मनात रामाचे स्मरण केले, त्याचे नाम घेतले, तर त्या नामाचा संस्कार दिवसभर मनावर राहतो. सकाळी ऐकलेले एखादे गाणे जसे दिवसभर ओठांवर रेंगाळते, तसेच पहाटे घेतलेले भगवन्नाम मनात गुंजत राहते. जसे एखादा रुग्ण सकाळी घेतलेल्या औषधामुळे दिवसभर सुदृढ राहतो, तसेच प्रभातीचे नामस्मरण मनाला अंतर्गत बळ देते.

समर्थ पुढे सांगतात ''पुढे वैखरी राम आधी वदावा'' - म्हणजे कोणतेही कार्य सुरू करण्यापूर्वी मुखाने, वाणीने रामनाम उच्चारावे. पूर्वी घराघरांत सकाळी स्तोत्रपठण, भजन, आरती यांची परंपरा होती. आजच्या वेगवान जीवनात ती कमी होत चालली आहे. अनेकदा प्रश्न विचारले जातातयाचा काय उपयोग? परंतु प्रत्येक गोष्ट विज्ञानाच्या कसोटीवर मोजता येत नाही; तरीही ती निरर्थक ठरत नाही.

प्रभातीचे चिंतन मनावर सुसंस्कार घडवते. दिवसाची सुरुवात मोबाईलच्या पडद्याने नव्हे, तर भगवंताच्या नामाने झाली, तर एकाग्रता, सकारात्मकता आणि संयम यांची वाढ होते. वाईट विचारांवर नियंत्रण ठेवण्याची शक्ती मिळते.

''प्रभाते'' या शब्दाचा आणखी एक अर्थ लावता येतो जीवनाची पहाट, म्हणजेच बालपण. लहान वयातच चांगल्या विचारांचे, सद्गुणांचे सिंचन झाले, तर ती शिदोरी आयुष्यभर साथ देते. म्हणूनच बालसंस्कारांचे महत्त्व अधोरेखित होते.

समर्थ पुढे म्हणतात ''सदाचार हा थोर सांडू नये तो.'' सदाचार म्हणजे शुद्ध, पवित्र आणि सुसंगत आचरण. सत्ता, संपत्ती किंवा पद यामुळे कोणी थोर होत नाही; तर ज्याच्या बोलण्यात आणि वागण्यात एकवाक्यता आहे, तो खरा थोर. तुकाराम महाराज म्हणतात ''बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊले.'' संतांचे आचरणच त्यांची खरी ओळख असते. अशा सदाचरणाचा अंगीकार करणारा मनुष्यच जगात खऱ्या अर्थाने धन्य ठरतो.

नामस्मरण, शुद्ध विचार आणि सदाचार या त्रिसूत्रीने दिवसाची आणि जीवनाची पहाट उजळून निघते.

स्वसंवाद : मी माझ्या दिवसाची सुरुवात भगवंताच्या चिंतनाने करतो का ?

मी करीत असलेले नामस्मरण ही केवळ सवय आहे की अंतर्मनाला बळ देणारी जाणीवपूर्वक कृती ?

माझ्या बोलण्यात आणि वागण्यात एकवाक्यता राखण्याचा मी प्रयत्न करतो का ? **(क्रमशः)**



दासबोध स्तवन

उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

श्रवणनिरूपण

ज्योतिर्मय साहित्य

नानातिर्थे करावीत, व्रते करावीत त्याचे फळ मिळेल.

रोग, व्याधी या उत्तम औषधाने बऱ्या होतात. पण श्रवणभक्ति ने देहबुद्धी मरते. मी आणि माझं हे आता उरत नाही. आपल्यातला

मी पणा संपतो.

परमात्म स्वरूपाचा साक्षात्कार होतो. सद्गुरूंचे आपल्या दैनंदिन व्यवहारात लक्ष असते आपले वागणे बोलणे, आहार,विहार , निद्रा, सात्विकता, स्वैराचार या सर्वांकडे लक्ष असते. म्हणून आपले आचारविचार डोळस हवेत. गर्व, तोरा, ताठा सद्गुरूनां आवडत नाही.श्रवणभक्तिने आपल्यात असलेले सगळे दुर्गुण नाहिसे होतात. म्हणून संतसहवासाचा नेहमी अट्टाहास धरावा.

तुम्ही महागडे तिकिट काढून सिनेमागृहात जाता. तिथले वातावरण निर्माण करण्याची कला निर्माता, दिग्दर्शकाला आलेली असते. पण गुंडगिरी, मारामारी, असे वाईट प्रसंग पाहिले तर आपण पैसे मोजून आपला अमूल्य वेळ खर्च करून हे वाईटकृत्य बघण्याची गरज काय आहे असे मला वाटते. त्यापेक्षा भगवंताचे नामस्मरण, निरूपण कथा ऐकल्या तर आनंद मिळतो.

मित्रांनो

बघा तुम्हाला नक्की श्रवणभक्तिचा पर्याय आवडेल हो ना !!!

आपण जे श्रवण करतो त्याच्या अर्थाकडे लक्ष देणे याला मनन म्हणतात. त्या मार्गावर आपले लक्ष एकाग्र झाले की त्यालानिदिध्यासन म्हणतात. निदिध्यासनाने आत्मसाक्षात्कार होतो जीवनभर समाधानी रहाण्याची वृत्ती वाढीस लागते. **(क्रमशः)**



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

नाम सद्गुरूकडून घेणे श्रेयस्कर !

ज्योतिर्मय साहित्य

नाम सद्गुरूकडून घेणे जरूर आहे, की ते आपणच आपल्या आवडीप्रमाणे घेतले तरी चालेल ? वास्तविक भगवंताचे नाम स्वत:सिद्ध आहे आणि परिपूर्ण आहे; त्याला दुसऱ्या कुठून पूर्णता प्राप्त करून घ्यायची असते असे नाही. म्हणून, सद्गुरूकडून घेतलेले नाम आणि आपण स्वत:च्या पसंतीने घेतलेले नाम ह्यांत फरक करता येत नाही. तरीसुद्धा, सद्गुरूकडून घेतलेल्या नामाचे वैशिष्ट्य आहेच. ते असे की, तो त्या नामाच्या पाठीशी सत्तारूपाने असतो, आणि आपल्याकडून नामस्मरण होण्यात त्याची आपल्याला फार मदत होते. त्यामुळे, आपल्या हातून होत असलेले नामस्मरण त्याच्या सत्तेनेच होत आहे ही जाणीव राहून, 'मी नामस्मरण करतो' अशा तऱ्हेचा अहंकार उत्पन्न व्हायला वावच राहात नाही. सद्गुरूच्या आज्ञेचे पालन करता करता साधकाला नामाची गोडी लागते, आणि नाम पोटभर घेतल्याने त्याचा आत्मा तृप्त होतो. म्हणून सद्गुरूकडून नाम घेणे जरूर आहे. सद्गुरुभेट होईपर्यंत मात्र आपण आपल्याकडून नामस्मरण करीत राहणे आवश्यक आहे, कारण ते नामस्मरणच आपल्याला सद्गुरूची भेट करवून देईल. तसे पाहता, आधी संताची भेट होणे कठीण; आणि समजा भेट झाली, तरी त्याच्यावर विश्वास बसणे त्याहून कठीण असते. म्हणून नामाचे साधन चालू ठेवावे. खडीसाखर ठेवली म्हणजे मुंगळ्यांना आमंत्रण करावे लागत नाही, ते आपोआप तिचा शोध काढीत येतात. तसे तुम्ही खडीसाखर बना म्हणजे संत तुमच्याकडे धावतच येतील. ' खडीसाखर बना' म्हणजे संतांना आवडेल असे वर्तन करा. संतांना काय आवडते ? भगवंताचे अनुसंधान आणि अखंड नामस्मरण, याशिवाय दुसरी कोणतीही गोष्ट त्यांना प्रिय नाही. म्हणून आपल्या हृदयामध्ये नामाची ज्योत अखंड तेवत ठेवा. सद्गुरू तुमचा शोध घेत येतील आणि तुमच्यावर कृपेचा वर्षाव करतील.

आता अशा रीतीने सद्गुरूने नाम दिल्यावर एखाद्याला असे वाटेल की, मी 'राम, राम' असे म्हणत होतोच, आणि आता सद्गुरूने तेच सांगितले; तर मग यात काय मोठे झाले ? '' पण यातच विशेष आहे, कारण यात 'मी कर्ता' हा अभिमान टाकावा लागतो. सद्गुरूकडून नाम घेतले म्हणजे आपल्या कर्ते पणाच्या अभिमानाला वाव रहात नाही. मिठाचा एकच खडा खीर नासवायला पुरेसा होतो, त्याप्रमाणे अभिमान हा सर्व साधन नासवायला कारणीभूत होतो. म्हणून अभिमान टाकणे ही गोष्ट फार महत्त्वाची ठरते. भगवंताचे नाम हे औषध समजावे; भगवंताची प्राप्ती हे त्याचे फळ; जरूर तेवढेच करणे, म्हणजे सांगितलेले तेवढेच करणे, जास्त न करणे, हे त्याचे अनुपान समजावे. औषध मात्र थेंबथेंब आणि सतत पोटात गेले पाहिजे.

साध्या शब्दांचासुद्धा आधार मोठा असतो. मग भगवंताच्या नामाचा आधार केवढा मोठा असेल.

श्री क्षेत्र नैमिष्यारण्य भागवत कथा व हरिनाम सप्ताह

भागवत कथाकार :
आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर
कथेचे श्रवण करताना धावते संकलन
मधुकर बोरीकर 9403061886

दिवस दुसरा

पुढे.....
इथे स्तुती, घटनात्मक, उपशात्म्यक घटना सांगितल्या जातात.
घटना का सांगितल्या जाते? आपल्या मनाला आकर्षित करून भक्तीत लावण्यासाठी ती सांगितल्या जाते.
कथा कीर्तनात झोप का येते? याचे कारण असे की, कुंभकर्णाची आवडती पत्नी निद्रा होती. रामांनी कुंभकर्णाची हत्या केली. यामुळे निद्रा विधवा झाली. तिने नंतर असा विचार केला की, आता परमार्थ करावा. म्हणून जिथे कथा कीर्तन असते, तिथे निद्रा उपस्थित असते.
घटना भगवंताच्या लीला आहेत, कांहीं चरित्र आहेत. कांहीं वेळेस भविष्य कांहीं घटना इतिहास तर कांहीं घटना उपाख्यान म्हणून सांगितल्या जातात.
कांहीं घटनेचे संदर्भ भूतकाळात असतात. म्हणून भगवंताला कुठे कुठे इतिहास सांगावा लागला. भीष्माचार्याचे शरपंजरी पडणे याचा संदर्भ त्या घटनेत लागत नाही, तर तिच्या इतिहासात आहे. उपदेशाचा इतिहास असतो.कली युगाचेही वर्णन भागवतात आहे. भागवतांचे द्रष्टेपण लक्षात घेऊन आणि परमात्म्याचे ग्रंथात तिरोहित होण्यामुळे आपणास त्याचे महत्व ध्यानात घ्यावे लागेल.
पुढचा जन्म जर वारकऱ्यांच्या घरात असावा असे वाटत असेल तर, आज पासूनच, रोज हरिपाठ आम्ही केला पाहिजे.
अध्याम असे सांगते की माणसाने दिवसभर असे वागावे की, त्याची रात्र सुखात जावी. वारकरी रात्री पडल्या पडल्या त्यास झोप लागते. कारण दिवस भर नाम संकीर्तन घडलेले असते.दिवसभर चांगले काम करावे, तरच झोप चांगली येते.दिवसा पाप घडले की झोप येत नाही.
भागवत आपल्याला इतिहास भविष्य व उपाख्यान सांगते. क्रमशः.....

मिनीवर बसून जेवणाचे फायदे

ज्योतिर्मय साहित्य

लवचिकता वाढवत

पद्मासनात बसल्याने, पाठीचे, कमरेतील तसेच पोटाजवळील स्नायूंवर ताण आल्याने पचनसंस्थेचा मार्ग सुधारतो. अशा स्थितीत बसल्याने पोटावर ताण येण्याऐवजी जेवण पचण्यास व ग्रहण करण्यास मदतच होते. परिणामी पोटाजवळील स्नायूंवर ताण आल्याने शरीर लवचिक व आरोग्यदायी बनण्यास मदत होते.

मन शांत होते व खाण्यावर लक्ष केंद्रित होते

जमिनीवर बसून जेवल्याने मेंदू शांत होतो व तुमचे सारे लक्ष जेवणाकडेच राहते. मनाची अस्थिरता कमी झाल्याने, जेवणातून मिळणारी पोषणतत्त्वे शरीर अधिक उत्तमप्रकारे ग्रहण करण्यास समर्थ होते.

कुटुंबातील सदस्यांशी जवळीक वाढते

दिवसातील किमान एका जेवणाचा आपल्या कुटूंबासोबत जरूर आनंद घ्यावा. दिवसभरातील क्षीण व ताणतणाव हलका होतो. तसेच एकमेकांशी बोलल्याने, काही समस्यांतून मार्ग शोधण्यास मदत होते व नकळत कुटूंबातील सदस्यांशी जवळीक वाढते.

शरीराची स्थिती (पॉश्चर) सुधारते

शरीराची स्थिती उत्तम राखणे हे निरोगी आरोग्याचे गमक आहे.शरीरातील काही स्नायू व सांध्यांवरील अतिरिक्त ताण कमी करून थकवा कमी होण्यासदेखील मदत होते. जमिनीवर बसून जेवताना पाठीचा कणा ताठ राहतो व पोट, खांदा व पाठीच्या स्नायूंची योग्य प्रमाणात हालचाल होते.

दीर्घायुषी बनवते

ही अतिशयोक्ती नाही. जमिनीवर बसून जेवल्याने आयुष्य वाढते. 'युरोपियन जर्नल ऑफ प्रेव्हेंटिव्ह कार्डीयॉलॉजि 'च्या अहवालात प्रसिद्ध केलेल्या अभ्यासानुसार, जमिनीवर मांडी घालून बसलेली व्यक्ती जर कशाचाही आधार न घेता उठली तर त्यांचे आयुष्यमान अधिक आहे, असे समजावे. कारण अशा स्थितीतून उठण्यासाठी शरीराची लवचिकता अधिक असणे गरजेचे आहे. आणि जी व्यक्ती उठू शकत नाही त्यांचा मृत्यू नजीकच्या ६ वर्षात होण्याची शक्यता ६.५ पटीने अधिक असते.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी–चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

गुडघे व कमरेतील सांधे मजबूत होतात - योगा फॉर हेलिंग या पुस्तकाचे लेखक पी.एस. वेंकटेशवरा यांच्यामते, पद्मासनामुळे शरीर निरोगी राहण्यास मदत होते. पचन संस्थेसोबतच सांधेदुखीचा त्रास होत नाही. गुडघा, घोटा व कंबरेतील सांधे लवचिक राहिल्याने अनेक विकार दूर होण्यास मदत होते. जमिनीवर बसल्याने स्नायूंबरोबर सांध्यांची लवचिकतादेखील वाढते.

चंचलता कमी होते

मांडी घालून किंवा पद्मासनात बसल्याने नसांमधील थकवा कमी होतो. म्हणूनच जेवताना जमिनीवर मांडी घालून बसण्याचा सल्ला दिला जातो. यामुळे मन, मेंदू व परिणामी शरीरातील त्रास कमी होतात.

हृदयाला होणारा रक्तपुरवठा सुधारतो

काही वेळेस जेवल्यानंतर तुम्हाला गरम होते किंवा घाम आल्याचे आठवते का ? हो हे शक्य आहे. कारण अन्नाचे पचन होण्यासाठी शरीराला उर्जेची अधिक गरज असते. खुर्चीवर बसण्याऐवजी जमिनीवर बसून जेवल्याने शरीरातील रक्तप्रवाह सुधारतो. तसेच पचनही सुधारते.

**

आनंदामृत ....

विचारमंथन प्राचीन वाङ्मयाचे...

अपर्णा परांजपे, कात्रज पुणे
मो. 95030 45495

प्रस्तावना विषयाची ..

"विक्रमादित्य" हे एक व्यक्तिनाम नसून उपाधी मानले जाते.
अनेक राजांनी ही उपाधी धारण केली, विशेषतः चंद्रगुप्त द्वितीय (गुप्त सम्राट).
उज्जैन हे त्यांचे प्रमुख केंद्र मानले जाते.
"विक्रम संवत" (इ.स.पू. ५७) हाही त्यांच्याशी जोडला जातो, पण इतिहासकारांमध्ये मतभेद आहेत.
म्हणजेच - विक्रमादित्य हा इतिहास आणि लोकपरंपरा यांच्या मधोमध उभा असलेला तेजस्वी प्रतीक आहे.
परंपरेनुसार विक्रमादित्याच्या दरबारातील नऊ विद्वानांना "नवरत्न" म्हटले जाते.
मात्र सर्वजण एकाच काळात होते का? यावर इतिहासकारांमध्ये शंका आहे. तरीही त्यांच्या योगदानाचे महत्त्व निर्विवाद आहे.

■१ : कालिदास
संस्कृत साहित्यातील सर्वोच्च कवी.
ग्रंथ : अभिज्ञानशाकुंतलम्, मेघदूतम्
निसर्ग, प्रेम आणि अध्यात्म यांचा अद्वैत संगम.
भारतीय काव्यपरंपरेचा शिखरबिंदू.
(कालिदास = संवेदनशीलता व काव्यदृष्टी
जेव्हा मन निसर्गाशी एकरूप होते, तेव्हा जीवनात सौंदर्य दिसू लागते. ही शक्ती आपल्याला करुणा आणि प्रेम शिकवते.)

■२ : वराहमिहिर
(विवेक व वैज्ञानिक दृष्टी
ग्रह-नक्षत्र म्हणजे बाह्य नव्हे तर अंतर्गत चढ-उतार.
विवेकाची शक्ती आपल्याला भावनांवर नियंत्रण शिकवते. खगोलशास्त्रज्ञ व ज्योतिषी.)

■३: धन्वंतरि
आयुर्वेद परंपरेतील महान चिकित्सक म्हणून स्मरण. आरोग्यशास्त्रातील तत्त्वज्ञान आणि उपचारपद्धतींचे प्रतिनिधित्व.
(आत्मउपचाराची क्षमता शरीर आणि मन स्वतःला संतुलित करू शकतात.
प्राणायाम, ध्यान, सकारात्मक विचार - हेच अंतर्गत औषध.)

■४ : अमर सिंह
ग्रंथ: अमरकोश
संस्कृत शब्दसंपत्तीचे अद्भुत संकलन.योग्य शब्दांची जाणीव (शब्द हे ब्रह्म आहेत. योग्य शब्द मन घडवतात; अयोग्य शब्द जखम करतात.)

५ : वररुचि
व्याकरण आणि भाषाविज्ञानातील पंडित.
काही परंपरांमध्ये त्यांना कात्यायनाशी जोडले जाते. (तर्कशुद्धता भावनांमध्ये वाहून न जाता सत्य शोधण्याची वृत्ती. "मी जे मानते तेच अंतिम आहे का?" असा प्रश्न विचारण्याची क्षमता.)

शब्दांची सुंदर गुंफण करणारे कवी श्री सुरेश शेठ

ज्योतिर्मय साहित्य

आज आपण ओळख करून घेणार आहोत, पुण्यातील नामांकित कवी श्री सुरेश शेठ यांची.

श्री सुरेश उर्फ शिरीष बाळकृष्ण शेठ हे बी.कॉम निवृत्त बँकर असून स्वेच्छानिवृत्तीनंतर त्यांनी कवितेचा छंद जोपासला. आतापर्यंत त्यांनी १५०० कविता व तीनशे गझलांचे लेखन केले आहे. आजवर १०० च्यावर वृत्त हाताळली असून त्यांना विविध विषयांवर विविध वृत्तातुन लिहावयाला आवडते तसेच ते समयोचित काव्यही लिहितात. रोज एक कविता हा त्यांचा मंत्र आहे, ध्यास आहे कारण कविता माझा श्वास आहे, प्राण आहे असे ते सांगतात. प्रसन्न व्यक्तिमत्व, बोलका स्वभाव असणारे सुरेश जी यांच्या कविता फार सुंदर, अर्थपूर्ण, गेयता असलेल्या व काही मनाला भिडणाऱ्या ही असतात. श्री सुरेश शेठ यांचे पारिजात, मनमोहर व शब्दझुला है तीन काव्य संग्रह प्रकाशित आहेत.

मनमोहर या काव्यसंग्रहाला प्रसिद्ध अभिनेत्री व कवयित्री सौ स्पृहा जोशी यांची प्रस्तावना लाभली आहे. तसेच या पुस्तकावर ख्यातनाम साहित्यिक मा. प्रवीण दवणे यांनी सुंदर अभिप्राय दिला आहे. त्यांच्या शब्द झुला या काव्यसंग्रहाला साहित्य अकादमी अवार्ड विजेत्या डॉक्टर सौ संगीता बर्वे यांनी प्रस्तावना दिली आहे व याचा प्रकाशन सोहळा वात्रटिकाकार व साहित्यिक श्री रामदास फुटाणे यांच्या शुभहस्ते झाला होता. कार्यक्रमासाठी श्रेया बुगडे व मेघना एरंडे या सुप्रसिद्ध अभिनेत्री उपस्थित होत्या.

श्री सुरेश शेठ हे अनेक राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित आहेत. त्यांना मिळालेले काही प्रमुख पुरस्कार –

शब्दसेतू व काव्य स्पंदन यांनी घेतलेल्या विविध स्पर्धांमध्ये पन्नासहून अधिक पुरस्कारांनी सन्मानित

पर्वती गौरव पुरस्कार २०२३, किशोर धोमकर फाउंडेशन शब्दगौरव पुरस्कार२०२३, अटलबिहारी वाजपेयी

स्मृतिप्रीत्यर्थ कवी पुरस्कार २०२३, महाकवी कालिदास काव्य पुरस्कार २०२३, विद्या उत्तेजक ट्रस्ट पुणे यांचा साहित्य गौरव पुरस्कार, तितिक्षा इंटरनॅशनल तर्फे घेण्यात आलेल्या विविध काव्यलेखन स्पर्धांमधे १० काव्यकरंडक तसेच तितिक्षा इंटरनॅशनल संस्थेचा मानाचा नाट्यशारदा साहित्य काव्य कोहिनूर पुरस्कार, सुनिला माईंच्या स्मृती प्रित्यर्थ झालेल्या गझल लेखन स्पर्धेत प्रथम क्रमांक, अक्षरभारती आयोजित पहिल्या आंतरराष्ट्रीय मराठी हझल लेखन स्पर्धेत प्रथम क्रमांक, मॉरीशस येथे २०२३ मधे झालेल्या १७ व्या कोमसाप केंद्रीय मराठी साहित्य संमेलनात सहभाग आणि कविता सादरीकरण. ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन दिल्ली येथे निमंत्रित कवि, अखिल भारतीय गुजराथी वणिक समाजातर्फे कविवर्य उपाधी देऊन सन्मानित करण्यात आले. मखमली मोरपीस –शब्दझुला या युट्यूब चॅनलवर अर्चना कापरे सुरेश शेठ यांच्या कवितांचे सादरीकरण करत असतात आजपर्यंत१०० व्हिडिओज् झाले आहेत.

सुरेश शेठ यांनी मागील दोन वर्षापासून स्वतःचा ब्रॉडकास्टिंग समूह सुरू केला आहे त्यावरून रोज एक नवीन कविता १८० काव्य रसिकापर्यंत पोहोचतात.

ओळख साहित्यिकांची

गिरीश खं. वसेकर (देशपांडे)
नांदेड सिटी,सिंहगड रोड
पुणे ९४२२६५९४००

त्यांचा सामाजिक कामातही सक्रिय सहभाग असतो. लायन्स क्लब पुणे शनिवारवाडाचे चार्टर्ड प्रेसिडेंट, विद्या उत्तेजक ट्रस्टचे माजी अध्यक्ष व ट्रस्टी वैष्णव जागृती अंकाचे संपादक मंडळ सदस्य ते आहेत.

श्री सुरेश शेठ यांच्या काही प्रसिद्ध कवितेच्या काही ओळी येथे देत आहे --

जागतिक कवितादिनी
कवितेवरील कवितांचे सप्तरंगी
इंद्रधन
१ कविता आणि कवी
शब्दासोबत शब्द मिसळता तयार
होई कविता
जसे जलाचे थेंब साठता वाहु
लागते सरिता
नाजुक–
भावुक,हळवे–
कोमल अनेक
त्यांच्या जाति
कधि ओथंबे
करुणा त्यातुन डोळे
पाणावती
पेन प्रसविते,
प्रणयाराधन उत्कट
प्रीती–भाव
कुणा स्मरतसे प्रेमभंग अन् ते
जखमेचे घाव
अवती–भवती निसर्ग सुंदर कवी
त्यात रमतो
कागदावरी पेनामधुनी चित्र–काव्य
रचतो
वास्तवतेची विकल अवस्था छळत
रहाते मनी
लिहिताना ते पेनही रडते दुःख
दिसे कवनी
जे न दिसतसे इथे रवीला तेही
कवि पाहतो
सरस्वतीच्या कृपाप्रसादे प्रतिभा
फुलवित असतो
२ कविता
नकळत होते
रोजच कविता
शब्द– खजिना
कधी न रिता
कधी मनाला
कोडे पडते
प्रतिदिन सारे
कोण घडवते
३ कविता
कविता भासे सरिता मजला
उगम तिचा हृदयी
जल शब्दांचे नित पाझरते
थांबत नाही कधी
जसा नदीचा प्रवास असतो
काट्याकुट्यातुनी
तशीच वाहे माझी कविता अवघड
मार्गातुनि
४ शब्दसामर्थ्य (अष्टाक्षरी)
शब्द मनी मांडताना,
भाव होतात बोलके
कधी हृदयामधुनी,
येती धावत नेमके
शब्द मनी मांडताना,
केव्हा रात्रभर जागा
स्वप्नामध्ये सापडती,
फुललेल्या शब्द–बागा
५: निष्प्रभ शब्दप्रभु
शब्दप्रभू हा झाला निष्प्रभ
सरून गेली सारी प्रतिभा
कागद हाती,साथ लेखणी
डोळे झरती, शब्द सुचेना
एक जमाना तोही होता
जगलो होतो मीही कविता
शब्दांनी मज केले पामर
मीच कफल्लक झालो आता
अश्या त्यांच्या अनेक
कवितागाजत आहेत.

श्री सुरेश शेठ यांना त्यांच्या साहित्यिक प्रवासासाठी
खूप खूप शुभेच्छा



जागतिक महिला दिनानिमित्त कविता लेखन स्पर्धेचे आयोजन

ज्योतिर्मय साहित्य

ध्यास गझल समूह, टेरेसवरील कविता समूह तर्फे जागतिक महिला दिनानिमित्त कविता लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धा केवळ महिलांसाठी असून वयाचे आणि विषयाचे बंधन नाही. विजेत्यांना सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ आणि दर्जेदार काव्यसंग्रह भेट दिला जाईल. आलेल्या कवितांमधून प्रथम ५ विजेते घोषित करण्यात येतील. विद्यार्थिनी व बाल कवयित्रीस दोन विशेष बक्षिसे देण्यात येतील. स्पर्धेत सहभाग घेण्यासाठी प्रवेश शुल्क १०० आकारण्यात आले आहे.कविता मो.क्रमांक ९४२३७७९५५३ वर पाठवावी.प्रवेश शुल्क ८३८०९७२५१८ ह्या क्रमांकावर दिनांक ७ मार्च पर्यंत पाठवावे.

छत्रपती संभाजीनगर येथे एका विशेष सोहळ्यात विजेत्यांना बक्षीस वितरण केले जाईल. विजेत्यांना कविता सादरीकरण करण्यासाठी संधी दिली जाईल. तरी जास्तीत जास्त कवयित्रींनी या स्पर्धेत सहभाग नोंदवावा असे आवाहन मृणाल देशपांडे, संध्या फुलपगार, रूपाली पाटील, कल्याणी कोळपकर, कवी गिरीश जोशी ह्यांनी केले आहे.

मराठी भाषा गौरव दिन

ज्योतिर्मय साहित्य

महाराष्ट्रात २७ फेब्रुवारी हा दिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा केला जातो. कवीवर्य कुसुमाग्रज अर्थात वि. वा. शिरवाडकर यांची आज जयंती.

या निमित्ताने आम्ही प्राथमिक शिक्षक शाळेत जे शिकवत असतो ते थोडे आपुलकीच्या माणसांना सांगावे वाटले. लहान मुलांना योग्य उच्चार शिकवले गेले नाहीत तर काय होते ते आपण सगळेच अनुभवत असतो. त्या साठी आम्ही प्राथमिक शिक्षक अगदी लहान वयाचे होऊन त्यांच्या वयाचा विचार करून काही गोष्टी सोप्या करून सांगतो. खूप वेळा त्यांच्यातले होऊन जावे लागते. आणि उच्चार चुकला तर काय गंमत होते आणि अर्थ कसा बदलतो हे दाखवावे लागते.

क, ख, ग, घ, ङ – यांना ✻कंठव्य✻ म्हणतात.कारण यांचा उच्चार करताना ध्वनि कंठातून निघतो.एकदा करून बघा.

च, छ, ज, झ,ञ– यांना ✻तालव्य✻ म्हणतात.कारण यांचा उच्चार करताना जीभ टाळू ला लागते.

एकदा करून बघा

ट, ठ, ड, ढ , ण– यांना ✻मूर्धन्य✻ म्हणतात.कारण यांचा उच्चार जीभ मूर्धा ला लागल्याने होतो.एकदा म्हणून बघा.

त, थ, द, ध, न– यांना ✻दंतव्य✻ म्हणतात.यांचा उच्चार करताना जीभ दातांना लागते.

एकदा म्हणून बघा.

प, फ, ब, भ, म,– यांना ✻ओष्ठ्य✻ म्हणतात.कारण यांचा उच्चार ओठ जुळल्याने होतो. एकदा म्हणून बघा .

हे लहान मुलांना सांगून चालत नाही. त्यांच्या कडून म्हणवून घ्यावे लागते. शिक्षकाने उच्चारणे व मुलांनी मागे म्हणणे हा एक आनंद सोहळा असतो. हे सगळे प्रात्यक्षिक करून घ्यावे लागते. तरच त्यांचे

उच्चार व लेखन योग्य होण्यासाठी मदत होते.

बरेचदा काही कविता तयार करून त्यातील गंमत दाखवावी लागते.

अशीच एक कविता.
बघा कशी वाटते..

एक काना वाढला आणि
अर्थच बदलला

मल झाला माल
गल झाली गाल
पल झाला पाल

विभावरी कुलकर्णी
८०८७८१०१९७

चल ची बदलली चाल
मत झाले मात
नत झाली नात
पत मधून उगवली पात
रत होताच झाली रात
मन चा वाढला मान
धन चे झाले धान
तन ने घेतली तान
नन झाली नान
तर बनले तार
मर बनले मार
हर झाला हार
गर झाला गार
सर चे झाले सार
पर ने केले पार
धर ची बदलली धार
खर बनली खार
भर चा झाला भार
नर ची झाली नार
सर चे झाले सार
चर चे झाले चार
गड झाले गाड
पड झाले पाड
झड झाली झाड
लड बनली लाड
कडी बनली काडी
गडी बनले गाडी
सड बनली साडी
वड झाले वाडी
गज बदलून झाली गाज
सज वर चढला साज
भज झाले भाज
मज ला चढला भलता माज
रग ला आला राग
मग ने काढला माग
नग बनला नाग
जग ला आली जाग
भंग ने पाडला भांग
रंग ने लावली रांग
संग वदला सांग
ढंग ची झाली ढांग
तप करता आला ताप
जप जपता झाला जाप
कपा ने केले काप
खप बनला खाप
टळ चे झाले टाळ
मळ ची झाली माळ
चळ चे झाले चाळ
गळ ने काढला गाळ
अशी माय मराठीची संपन्नता
उभी रेघ अवतरता
अकार आकार होता
शब्दांच्या अर्थात येते परिवर्तनता.

आपल्याला आपल्या भाषेचा अभिमान वाटतो पण तो का? कारण एवढी वैज्ञानिकता इतर कुठल्या ही भाषेत नसेल. म्हणून आपली भाषा अभिमानाने बोलू या.

मराठी भाषा गौरव दिनाच्या शुभेच्छा!

✻✻

मूल मराठी लेखिका - उज्ज्वला केळकर
हिन्दी अनुवादिका - डॉ. मीना श्रीवास्तव

स्मृति का उत्तरीय

आगे.....

"सोचती, परी मिलनी चाहिए और परी के राज्य में घूमकर आऊं| भूत से डर तो लगता था, लेकिन उसके बावजूद उसे देखने की उत्सुकता डर से कहीं अधिक थी| कहते हैं उसके पांव उलटे होते हैं, लेकिन कैसे यानि सचमुच कैसे दिखते होंगे यहीं तो देखना था|

एक बार मैंने इंद्रधनुषी रंग के फूल की कहानी पढ़ी। फिर क्या था! मैं हर पेड़ पर सप्त रंगों वाले फूल की खोज में लग गई| अपने पड़ोसी गोपाल से मैंने कहा, 'अगर तुम्हें इंद्रधनुष के सात रंगों वाली पंखुड़ियों वाला कोई फूल दिखे, तो मुझे बताना!' गोपाल मुझसे तीन-चार साल बड़ा था|

"क्यों?" उसने पूछा|

"हमारा एक राज है।"

"पहले मुझे वह राज सुनाओ। फिर मैं तुम्हें बताऊंगा"

"अरे सुनो! अगर मैं उसकी एक एक कर पंखुड़ी तोड़ते हुए कहा कि अरे उड़ती पंखुड़ी, जल्दी उड़ जा| मेरी इच्छा पूरी करना, ऐसे कहकर फिर अपनी इच्छा उसे कहकर बताई तो वह पूरी हो जाती है|" "यह सब झूठी बकवास है| ऐसा कोई जादू नहीं होता। दुनिया भर में कोई जादुई अंगूठी नहीं होती, न ही कोई जादू की छड़ी! दुनिया में जादुई जैसी कोई चीज नहीं होती|"

"मुझे कभी मिले तो तुम्हें जरूर बताऊंगी| तब तो विश्वास करोगे ना मुझपर! खैर, वह छोडो । तुम परियों और भूतों में तो विश्वास करते हो न?"

"नहीं, बिलकुल भी नहीं।"

'उसके बाद दो तीन वर्षों के पश्चात् मुझे भी जादुई वस्तुएं, परियां, और भूत प्रेत जैसी चीजें बकवास लगने लगीं|" वह रुआँसी होकर कहने लगी|

"लेकिन सुन तो, कोई बात नहीं, मुझे अब भी जादूभरी, परियों और भूतों की अद्भुत कहानियाँ पढ़ना बहुत अच्छी लगता है। भले ही वो झूठ मूठ ही क्यों न हो..." और वह रुआँसी हुई छोटी गुड़िया झट से खिलखिलाकर हंस पड़ी।" क्रमश :.....

बालबुद्धीला, विचारांना धार लावणारा - आकाश कोडी

ज्योतिर्मय साहित्य

मुखपृष्ठावर दोन मुलं आकाशातील गमती जमती पाहून विचार करताना दिसत आहेत. मनाला प्रश्न पडलेला दिसतो आहे त्या प्रश्नाचे उत्तर ते विचारातून शोधत आहेत. मलपृष्ठ. या पुस्तकाला डॉ . मनोहर जाधव यांची पाठराखण आहे. बाल वयात मुलांजवळ निर्लेप संवेदनशीलता व प्रखर ग्रहण क्षमता असते. मुलांची चौकस बुद्धी वाढविण्यासाठी हा कविता संग्रह उपयोगी आहे. वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्यासाठी हा काव्य संग्रह कोडी संग्रह उपयुक्त आहे. असे मत त्यांनी मल पृष्ठावर व्यक्त केलेआहे. हा काव्यसंग्रह शिक्षकांसाठी, पालकांसाठी विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त आहे.

यात एकूण तेवीस कोड्यांचा समावेश आहे. पुस्तकाचा कागद अतिशय टिकाऊ आहे. रंगीबेरंगी चित्रांमुळे बालमन आकृष्ट होते.

ओळखा या कवितेतून

'' आपणास जरी दिसते निळे
ते विशाल पोकळी काळे
असंख्य त्यात आकाशगंगा
अगणित तयात ताऱ्यांच्या
रांगा''

प्रत्येक चारोळीतून निघणारे उत्तर हे पूर्ण काव्याचे देखील उत्तर इतकी सुरेख कल्पकता कल्पनाविलास मुलांचे कुतूहल जागृत करणारा आहे.बालसाहित्य हे मुलांच्या कल्पनाशक्तीला चालना देणारे, विचारांना वळण देणारे आणि शिकण्याची प्रक्रिया आनंददायी करणारे माध्यम असते. अशाच वैशिष्ट्यांनी नटलेला आकाश कोडी हा प्रा. देवबा पाटील यांचा बालकाव्यसंग्रह लहान वाचकांसाठी अत्यंत रंजक आणि बौद्धिक खेळ घडवणारा ठरतो.

या संग्रहात एकूण तेवीस कविता असून प्रत्येक कविता ही केवळ वाचनासाठी नसून विचारप्रवृत्त करणारी कोडी म्हणून उभी राहते. प्रत्येक कडव्यातून एखादी गोष्ट, वस्तू, नैसर्गिक घटक किंवा अनुभव सूचक शब्दांत मांडला जातो आणि त्या कडव्याचे

उत्तरच संपूर्ण कवितेचा आशय उलगडणारे ठरते. त्यामुळे वाचकाला केवळ कविता वाचण्याचा आनंद मिळत नाही, तर तो त्या कवितेत सक्रिय सहभागी होतो. मुलांच्या निरीक्षणशक्ती, तर्कबुद्धी आणि कल्पनाशक्तीचा विकास घडवण्याचा हा अत्यंत परिणामकारक प्रयत्न आहे.

लेखक प्रा. देवबा पाटील यांनी भाषेचा वापर अत्यंत सोपा, लयबद्ध आणि बालमनाला सुसंगत ठेवला आहे. ओळी लहान, सहज उच्चारता येतील अशा आणि गेयतेने नटलेल्या असल्याने कविता वाचताना मुलांना आनंद वाटतो. कोड्यांची रचना अशी आहे की ती ना फार कठीण वाटतात, ना अगदी सोपीम्हणून मुलांमध्ये विचार करण्याची उत्सुकता टिकून राहते.

या काव्यसंग्रहाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे शिक्षण आणि मनोरंजन यांचा सुंदर संगम. वर्गात शिक्षकांनी वाचन, समूहचर्चा किंवा खेळाच्या स्वरूपात या कविता घेतल्या तर विद्यार्थ्यांचा सहभाग वाढू शकतो. भाषिक कौशल्य, शब्दसंपदा आणि आकलनशक्ती विकसित करण्यासाठी हा संग्रह उपयुक्त ठरतो.

कवितांमधील आशय मुलांना निसर्ग, दैनंदिन जीवनातील गोष्टी आणि आसपासच्या जगाशी जोडतो. त्यामुळे वाचन ही केवळ अभ्यासाची गोष्ट न राहता शोधयात्रा बनते. कोड्यांच्या माध्यमातून ज्ञान देण्याची परंपरा या पुस्तकातून नव्या रूपात अनुभवायला मिळते.

एकूणच, हा बालकाव्यसंग्रह मुलांना विचार करायला लावणारा, हसवत-खेळवत शिकवणारा आणि साहित्याशी मैत्री करून देणारा आहे. बालवाचक, शिक्षक आणि पालक या तिघांसाठीही हे पुस्तक उपयुक्त व आनंददायी ठरेल.आकाश कोडी हा प्रा. देवबा पाटील यांचा बालकाव्यसंग्रह लहान मुलांसाठी मनोरंजन आणि बौद्धिक विकास यांचा सुंदर संगम घडवणारा आहे. या संग्रहात एकूण तेवीस कविता असून प्रत्येक कविता कोड्याच्या स्वरूपात रचलेली आहे. प्रत्येक कडव्यातून सूचक वर्णन केलेले असते आणि त्या कडव्याचे उत्तरच संपूर्ण कवितेचा अर्थ स्पष्ट करणारे ठरते.

कवितांची भाषा सोपी, लयबद्ध आणि गेय असल्यामुळे मुलांना त्या सहज वाचता व म्हणता येतात. या कोड्यांमुळे मुलांची निरीक्षणशक्ती, विचारशक्ती आणि कल्पनाशक्ती वाढीस लागते. वाचनासोबत विचार करण्याची सवय लागावी, हा या पुस्तकाचा मुख्य हेतू जाणवतो.

शिक्षकांनी वर्गात उपक्रमरूपाने वापरावे आणि पालकांनी मुलांसोबत वाचावे असे हे पुस्तक आहे. खेळता-खेळता शिकवण देणारा हा काव्यसंग्रह बालसाहित्यातील एक उपयुक्त आणि आनंददायी बहारदार ठरतो.

या कोडी संग्रहातील आवडलेल्या ओळी

सूर्य स्फोटातून
झाली निर्माण
त्याने गुंफली माळा छान
एक बहीण आठ भाऊ
माझी मुलं आहेत नऊ
उत्तर. सूर्यमाला
सकाळी पडता भूवर
आनंद होतो साऱ्यांस
तुमच्यापैकी कुणीतरी
ओळखा ना तयास
उत्तर.सूर्यप्रकाश
सुंदर सुंदर मोठ्या लहान
कला दाखवतो छान छान
पौर्णिमेला पूर्ण गोलाकार
तो दिसतो खूप सुंदर
उत्तर. चंद्र
तो दिसतो सदैव स्थिर
आपणास निरंतर
लकाकतो भरपूर
त्याची दिशा उत्तर
उत्तर. ध्रुवतारा

सर्व बालमनावर प्रभावी अविस्मरणीय छाप पडणारा सुरेख कोडी संग्रह - आकाश कोडी. सर्वांनी आवर्जून वाचावा आणि वैयक्तिक ग्रंथालयात संग्रही ठेवावा असा उपयोगी कोडी संग्रह.

पुस्तकाचे नाव. आकाश कोडी
लेखकाचे नाव. प्रा. देवबा शिवाजी पाटील
पृष्ठ संख्या. ३६ किंमत.१३०
प्रकाशन. दिलीपराज प्रकाशन
मुखपृष्ठ व आतील चित्रे. संतोष घोंगडे

विविध मनोरंजनपर खेळांमध्ये रमले लिनियर गार्डन संघाचे ज्येष्ठ नागरिक

ज्योतिर्मय साहित्य

पुणे : पी. एन. गाडगीळ ज्वेलर्स आणि पद्माक्षी इव्हेंट मॅनेजमेंटच्यावतीने आयोजित विविध मनोरंजनपर स्पर्धा आणि खेळांचा ज्येष्ठ नागरिकांनी आनंद लुटला. सदरील स्पर्धांमध्ये पिंपळे सौदागर येथील लिनीयर गार्डन ज्येष्ठ नागरिक संघाच्या जवळपास शंभर सदस्यांनी सहभाग नोंदवित आनंदाने आणि उत्साहाने आनंद द्विगुणित केला. गोविंद गार्डन चौकातील पटांगणात नुकतेच या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. लकी ड्रॉ कूपन मध्ये अविनाश पुराणिक यांना पहिले बक्षीस मिळाले. अशोक पाटील आणि कीर्तीमाला मोरे यांना विशेष बक्षिसांनी सन्मानित करण्यात आले. लिनियर गार्डन ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष अशोक वारकर यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमासाठी हरिमोहन तिवारी, सी व्ही ब्राह्मणकर, प्रदीप बादगुडे, बोरसे पाटील, विकास अकोले , रवींद्र संधानशिवे शरदकांत नेरकर, किशोर देशमुख, मोहन राळभाते, अश्विनीताई शेखर, कीर्तीमाला मोरे, छायाताई वायकर यांनी परिश्रम घेतले.

शेतकऱ्यालाच मुलगी का दिली पाहिजे?

ज्योतिर्मय साहित्य

पांढरपेशी लाचारीपेक्षा मातीचं स्वराज्य कधीही उजवं!

आजच्या सुशिक्षित म्हणवल्या जाणाऱ्या समाजात एक विदारक मानसिकता फोफावतेय ''मुलगा शेती करतो? मग नको, आम्हाला शहरातला नोकरीवालाच नवरदेव पाहिजे!'' पण हा निर्णय घेताना पालकांनी एकदा विचार करावा की, आपण आपल्या काळजाच्या तुकड्याला खऱ्या सुखाच्या दिशेने नेतोय की सिमेंटच्या खुराड्यात कोंडतोय? एक कृषी पदवीधर म्हणून, मी मांडलेलं हे वास्तव आजच्या काळाची गरज आहे.

१. शुद्ध आहार आणि निरोगी आयुष्य (ऑरगॅनिक लाईफ):

शहरात कितीही मोठा पगार असला, तरी ताटात येणारं दूध भेसळयुक्त असतं आणि भाज्या दोन-तीन दिवसांच्या

शिळ्या असतात. शेतकऱ्याच्या घरात विहिरीचं शुद्ध पाणी, गाई-म्हशीचं ताजं धारेचं दूध आणि अर्ध्या तासापूर्वी शेतातून तोडून आणलेली सेंद्रिय भाजी असते. शहरातल्या करोडपतीलाही विकत न मिळणारी शुद्ध हवा शेतकऱ्याच्या लेकीला विनामूल्य मिळते.

२. ७/१२ वरची हक्काची मालकी:

शहरात राहणारा तरुण आयुष्यभर फ्लॅटचे हप्ते भरण्यात स्वतःचं आयुष्य संपवतो. पण शेतकरी हा कोणाचा नोकर नसून तो आपल्या जमिनीचा शहेनशहा असतो. स्वतःची विहीर, स्वतःचं प्रशस्त घर आणि निसर्गाची सोबत ही कोणत्याही पंचतारांकित सुखेपेक्षा मोठी श्रीमंती आहे.

३. आर्थिक शाश्वतता आणि स्वातंत्र्य:

नोकरी आज आहे, उद्या नाही. पण शेती हा जगाचा आधार आहे. आजचा तरुण शेतकरी अडाणी नाही, तो आधुनिक तंत्रज्ञान वापरून शेती करतोय. तो कोणाच्या तरी हाताखाली १० तास राबण्याऐवजी स्वतःच्या वेळेचा राजा आहे, जो आपल्या कुटुंबाला पुरेसा वेळ देऊ शकतो.

४. कष्टाळू आणि जबाबदार जोडीदार:

जो तरुण निसर्गाशी झुंज देऊन मातीतून सोनं पिकवू शकतो, तो तुमच्या लेकीला फुलासारखं जपण्याची ताकद नक्कीच ठेवतो. शेतकऱ्याचा मुलगा संकटांशी लढायला शिकलेला असतो, तो जबाबदारी पेलणारा असतो.

निष्कर्ष : मुलीच्या भविष्याचा विचार करताना केवळ डिग्री किंवा शहराचं नाव पाहू नका. ज्याच्या दारात स्वतःची गाडी आहे, शेतात स्वतःची विहीर आहे आणि जो स्वाभिमानाने स्वतःच्या मातीवर उभा आहे, अशा शेतकरी नवरदेवाला सन्मानाने स्वीकारा.

इस्रायलच्या सिंहगर्जनेचा अन्वयार्थ

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

अणु कार्यक्रमाला चाप

इराणच्या अणु कार्यक्रमाला लगाम बसविणे हा प्रधान उद्देश ठेवून अमेरिका युद्धात उतरली आहे. कारण इराण आपल्या हार्मोन्स खाडीमध्ये अमेरिकन नौदलाची कोंडी करू इच्छित होता. शिवाय हा मास आणि होती या बंडखोरांच्या मदतीने इराणचे प्रॉक्सीवर म्हणजे छाया युद्ध गेल्या चार-पाच वर्षापासून चालू होते, आणि विशेषतः ७ ऑक्टोबरच्या मध्यरात्री हमासने इस्रायलवर केलेल्या क्रूर व रानटी हल्ल्यानंतर इराणच्या महत्त्वाकांक्षा अधिक वाढल्या होत्या. याच तंत्राचा वापर करून शेजारी राष्ट्रातील दहशतवादी गटांना प्रवृत्त करून त्यांच्या मदतीने इजरायल विरुद्ध सातत्याने कुरापती चालू ठेवण्याचे तंत्र इराणने अनुसरले होते आता त्यांच्या या प्रतिक्रियावादी राजकारणाला या मोहिमेने चांगलाच लगाम घातला आहे इजरायल ची गुप्तचर यंत्रणा आणि अमेरिकेचे प्रगत युद्ध तंत्र यामुळे ही दुहेरी मोहीम गतीने पुढे सरकत आहे.

इराणच्या काही मर्यादा

शांतता बोलणीच्या तीनही फ ेऱ्यांमध्ये इराणने घेतलेली उलटसुलट भूमिका ही इराणची सर्वात मोठी मर्यादा आहे. शिवाय प्रतिक्रिया म्हणून अमेरिकेच्या लष्करी तळावर इराणने केलेल्या ड्रोन व क्षेपणास्त्र हल्ल्यास फारसे यश आले नाही. अमेरिकेने ४० सैनिक गमावल्याचा दावा इराण करत असला तरीही प्रत्यक्ष अमेरिकेने मात्र असे काहीही नुकसान झाले नाही असे सांगून हा दावा फेटाळून लावला आहे आधुनिक युद्ध तंत्रातील प्रगतक्षेपणास्त्रांचा अचूक वापर आणि वेळेचे नियोजन तसेच स्तनकालसापेक्षतेचा अभ्यास यामुळे इराणला मागे टाकण्यात इजरायल यशस्वी ठरत आहे. इजरायलने इराण

मध्ये अत्यंत खोलवर जाऊन केलेले हवाई हल्ले हेच सांगतात की इराणच्या भूराजण्याची क्षमतांचा नेत्यांनी यांच्या लष्कर प्रमुखांनी सखोल अभ्यास केला होता. त्यांची हवाई केंद्रे आणू शकते क्षेपणास्त्र बिंदू या सर्वांची अचूक माहिती मोसादने संकलित केल्यामुळे नेमका आणि अचूक मारा हे इजरायलचे यश आहे, तर अंतर्गत मतभेद आणि लोकांचा वाढता असंतोष या बाबी सुद्धा इराणमधील राजसत्तेच्या पतनासाठी कारणीभूत ठरत आहेत. दोन महिन्यापासून चाललेल्या प्रक्षुब्ध आंदोलकावर ज्या पद्धतीने मृत्युदंड खोटवण्यात आला. आणि आंदोलकांची क्रूरपणे मुस्कटदाबी करण्यात आली त्यामुळे सुद्धा इराणमधील जनता सत्ताधारी राजवटी राजवटीस विटली होती. आता डोनाल्ड ट्रम्प यांनी या परिस्थितीत जनतेने लोकप्रिय सरकार प्रस्थापित करण्यासाठी पुढाकार घ्यावा असे अर्थपूर्ण आवाहन केले आहे. तेथील जनता आता या आव्हानास किती प्रतिसाद देते ते पहावयाचे आहे.

युद्धबंदी आणि शांतता

युद्धामुळे प्रश्न सुटत नाहीत तर ते बिकट होतात हे सूत्र लक्षात घेऊन भारताने प्रारंभापासूनच संवाद आणि कुटनिती या मार्गाचा अवलंब करून प्रश्न सोडवावा असे आवाहन केले होते. परंतु या संदर्भात जी शांतता बोलणी झाली त्यामध्ये तडजोडी पेक्षा अडवणूक करण्याचे धोरण इराणने स्वीकारले. त्यामुळे त्यांनी आपल्याच पायावर धोंडा घालून घेतला भारताचे पंतप्रधान नरेंद्र भाई मोदी हे तीनही पक्षांना शांतता व सबुरीचा सल्ला सातत्याने देत आहेत. युद्ध सुरू झाल्यापासून दोन-तीन दिवसात भारताचे परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनी आखातातील सर्व परराष्ट्र मंत्र्यांशी बोलणी करून युद्ध कसे थांबविता येईल याबद्दल विचार विनिमयास प्रारंभ केला आहे. संयुक्त राष्ट्र संघाचे सरचिटणीस अँटेनियो गुटेरस यांनी सुद्धा युद्धातील हल्ले व प्रति हल्ले या दोघांचाही निषेध करून सध्याच्या घडीला युद्धबंदी आणि शांतता हाच खरा मार्ग आहे असे प्रतिपादन केले आहे. वर्तमान काळातील युद्धे दीर्घकाळ चालत नाहीत ती युद्ध लवकर थांबली तर जीवित आणि वित्तहानी कमी होते हे लक्षात घेऊन उभय पक्षांना एका व्यासपीठावर आणून शांतता कशी निर्माण करता येईल यावर भर दिला पाहिजे तसे झाले तरच पश्चिम आशियातील युद्धाचे क्षेत्र व्यापक न होता अधिक सीमित राहू शकेल.

समारोप

आधुनिक युद्धतंत्रामुळे कुठल्याही युद्धात जीत व जेते हे दोघेही हतबल होतात, दोन्ही बाजूंनी मोठ्या प्रमाणात जीवित आणि वित्तहानी होते. युद्धामुळे प्रश्न सुटत नाहीत तर बिकट होतात हे लक्षात घेऊन या युद्धाची व्याप्ती कशी कमी करता येईल, लोकांच्या नित्य जीवनशैलीवर त्यांच्या आहार विहार व आरोग्यावर होणारे प्रतिकूल परिणाम कसे कमी करता येतील, याचा विचार करून शांतता तातडीने प्रस्थापित करणे आवश्यक आहे. त्यासाठी भारतासारख्या तटस्थ व अलिप्त देशाने उभय पक्षी तडजोड घडून आणण्यात पुढाकार घेतला तरच युद्धाचा तीव्रता चटका कमी होऊ शकेल. गडगडणारे युद्धाचे ढग आणि अडखळणारी शांतता अशा विचित्र कोंडीत सध्या पश्चिम आशिया सापडला आहे. या कोंडीतून सबंध मध्यपूर्वेची सुटका कशी करणार आणि या आखाती देशांना संभाव्य युद्धाच्या तावडीतून कसे मुक्त करणार यावरच तेथील भावी प्रगतीचा मार्ग अवलंबून आहे. जर अनर्थ टाळावयाचा असेल तर शांतता तडजोड हाच खरा मार्ग आहे संभाव्य युद्धाचा जागतिक पुरवठा साखळीवर परिणाम होऊ शकतो महागाई वाढू शकते आणि जीवनावश्यक वस्तूंचे संकट निर्माण होऊ शकते हे लक्षात घेऊन युद्धा ऐवजी शांतता संघर्ष ऐवजी तडजोड संवाद आणि कुटनिती या आधारे प्रश्न सोडविण्यावर भर दिला तरच शांततेची पहाट होऊ शकेल आणि जग युद्धाच्या चटक्यापासून मुक्त होऊ शकेल. ***

करूया जागर मराठीचा

ज्योतिर्मय साहित्य

लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी
जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी
धर्म पंथ जात, एक मानतो मराठी
एवढ्या जगात माय मानतो मराठी

ह्या सुरेश भटांच्या कवीतेच्या ओळी ऐकल्या की, उर भरून येते, मराठी असल्याचा अभिमान ही वाटतो. गेल्या वर्षी ३ ऑक्टोबर २०२४ रोजी केंद्र सरकारकडून अधिकृतपणे मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला. आणि खऱ्या अर्थाने राष्ट्रीय पातळीवर जुनी आणि समृद्ध भाषा म्हणून मराठी भाषेची दखल घेतली गेली. एकेकाळी सह्याद्रीच्या कड्या कपारीतून दुमदुमणारी मराठी आज कुठेतरी आपल्याच महाराष्ट्रात दबक्या आवाजात बोलताना, अडखळत प्रवास करताना, स्वतःचे अस्तित्व चाचपडताना दिसत आहे. जिने आपल्याला बोलायला शिकवले, जी आपला आवाज बनली, जिच्यामुळे आपलं अस्तित्व आहे, तिचेच अस्तित्व आज धोक्यात आहे, नाही का? माझ्या मराठीचा गोडवा अमृताहुनी गोड आहे. पण तो गोडवा चाखणारी चोखंदळ मराठी वाचक दुर्मिळ होत चालले आहेत. कोणत्याही भाषेचा दर्जा हा त्या भाषेतील साहित्यामुळे वाढतो. जितके जास्त आणि दर्जेदार साहित्य तितका त्या भाषेचा दर्जा उंचावतो. दर्जेदार लेखन, चोखंदळ वाचक आणि आपल्या भाषेवर प्रेम करणारे मराठी भाषिक सर्वांनी एकत्रितरित्या आपल्या भाषेला कुरवाळले पाहिजे, तिचे लाड केले पाहिजेत, मग बघा तिला बहरायला वेळ लागणार नाही. मराठी भाषा जगली पाहिजे, टिकली पाहिजे, ही जबाबदारी आपली प्रत्येकाची आहे. असं म्हणतात, भाषा टिकली तर संस्कृती टिकते. आपली संस्कृती टिकवायची असेल, मराठीची ती गर्जना दऱ्याखोऱ्यातून पुन्हा ऐकायची असेल, तर तिची जोपासना करूया, तिचे संवर्धन करूया,तिला बळकटी देऊया.

अर्चना हिंगलजकर,
शिरवळ, 9225527464

मराठी भाषेला अनेक संत साहित्यिकांचा वारसा आहे. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत जनाबाई, संत रामदास, यासारख्या अनेक संतांनी या भाषेवर आईसारखं प्रेम केलं . त्यांचाच वारसा जपत अनेक लेखक, कवी, साहित्यिक यांनी आपल्या समृद्ध लेखणीने मराठी भाषेचे सौंदर्य वाढवले. आपल्या भाषेचे महत्त्व वाढवायचे असेल तर आपल्या भाषेतील उत्तम साहित्य, उदात्त लेखन, विविध भाषेमध्ये अनुवादित करून सर्वदूर पोहोचवले पाहिजे.

वि. वा.शिरवाडकर, वि.स.खांडेकर, विं.दा. करंदीकर, भालचंद्र नेमाडे यासारखे ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त लेखक त्याचबरोबर पु.ल. देशपांडे, प्र.के. अत्रे, व.पु. काळे, सुरेश भट, बहिणाबाई, इंदिरा संत, साने गुरुजी यासारखी असंख्य नावे घेता येतील ज्यांनी मराठी भाषेला सर्वांगांनी समृद्ध केले. आपली संस्कृती, आपली भाषा टिकवायची असेल तर हे लेखन आपल्या जेन जी, अल्फा पिढीने वाचावे असा आग्रह धरला पाहिजे किंबहुना हे वाचणे का गरजेचे आहे याचे महत्त्व त्यांना पटवून दिले पाहिजे. मातृभाषेतील वाचन आपल्या कल्पक बुद्धीला वृद्धिंगत करते. आपल्या व्यक्तिमत्वाला साज चढवते, हे त्यांना पटवून द्यायला हवे.

अनेक वर्षाच्या, अनेक लोकांच्या अथक परिश्रमातून आपल्या भाषेला अभिजात भाषेचा दर्जा तर मिळाला, पण ते टिकवणे, जतन करणे, वाढवणे ही आता प्रत्येक मराठी मनाची जबाबदारी आहे. जिला आपण मातृभाषा म्हणतो, तिचा प्रत्येक मराठी मनाने आदर केला पाहिजे, तिचा सन्मान केला पाहिजे, तिच्याशी हितगुज साधला पाहिजे अर्थातच तिचा जागर केला पाहिजे. आणि प्रत्येकाने मराठी असल्याचा अभिमान बाळगला पाहिजे. आज मराठी राज्यभाषा दिनानिमित्त प्रत्येकाने त्या मातृभाषेचे पांग फेडण्याकरिता एक शपथ घेऊया.मराठी भाषा टिकली पाहिजे, त्यासाठी प्रथमतः मराठी शाळा टिकल्या पाहिजेत. इंग्रजी माध्यम शाळेतच आपले पाल्य शिकले पाहिजे हा अट्टाहास सोडूया. मातृभाषेतून शिकलेली मराठी संस्कृती जपणारी पिढी घडवूया.त्या साठी काय करावे लागेल ह्याचा प्रत्येकानी गांभीर्याने विचार करूया. मराठी भाषा टिकवूया.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559